महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयात विमा माध्यमातून जमा होणाऱ्या निधीचा विनीयोग करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्रमांकः वैशिवि-२०१७/प्र.क्र.२८२/प्रशा-२**

लोकमान्य टिळक रोड, नवीन मंत्रालय, मुंबई -००१ ४०० .

दिनांक : २१ सप्टेंबर, २०१८.

वाचा :- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.रागांयो-२०१६/प्र.क्र.६४/आरोग्य-६, दि.०४.०८.२०१६.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त शासन निर्णय दिनांक ०४.०८.२०१६ अन्वये राज्यात दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना गंभीर व खर्चिक आजारांवरील मोफत उपचार देण्यासाठी राज्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना नवीन स्वरूपात राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांमध्ये रुग्णोपचार घेणाऱ्या सद्य:स्थितीतील रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ करणे, विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांमध्ये असलेल्या पायाभूत सुविधा व तज्ञ डॉक्टरांचा लाभ अधिकाधिक रुग्णांनी घ्यावा व त्यानुषंगाने विभागातील संस्थांना सदर योजनेच्या कार्यपध्दतीनुसार व मार्गदर्शक सूचनांनूसार विमा माध्यमातून प्राप्त होणाऱ्या रकमेचा संबंधित संस्थेच्या बळकटीकरणासाठी व काही महत्वाच्या आवर्ती खर्चासाठी व्हावा, सदर योजनेंतर्गत रुग्णोपचार प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या संबंधित विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सदर योजनेंतर्गत प्राप्त होणारा काही निधी प्रोत्साहन स्वरूपात अदा करून त्यांचा उत्साह वाढविणे, सदर योजनेचे दावे तयार करण्यासाठी बाह्यस्त्रोतामार्फत ई-निविदा कार्यपध्दतीने कंपनीची निवड करणे, सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीपैकी काही निधी राज्य

Scanned by CamScanner

शासनास समर्पित करणे, इत्यादी बाबी शासन विचाराधीन होत्या. याबाबत दिनांक ११.०९.२०१८ रोजीच्या मंत्रीमडळ बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करयात येत आहे.

**शासन निर्णय :-**

विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालये व संलग्नित रूग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्गमित केलेल्या उपरोक्त शासन निर्णय, दिनांक ०४.०८.२०१६ मधील तरतूदी व मार्गदर्शक सूचनानुसार विभागास सदर योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या रुग्णोपचाराच्या अनुषंगाने विमा माध्यमातून संबंधित संस्थेस निधी प्राप्त होतो. सदर निधीचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीनुसार विमा कंपनीकडून विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांना संबंधित आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या एकूण विमा रक्कम / निधीपैकी २५ टक्के निधी प्रतिवर्षी शासनास (वित्त विभागास) समर्पित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या रुग्णसेवेच्या प्रयोजनार्थ विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांना प्राप्त होणाऱ्या विमा रकमेपैकी प्रत्येक प्रकरणपरत्वे २० टक्के रक्कम प्रोस्ताहन भत्ता म्हणून सदर रुग्णसेवा पुरविणाऱ्या संस्थेतील खालील संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना अदा करण्यात येईल:-

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी पदनाम | मेडिकल प्रोसीजर साठी अदा करावयाचा प्रोत्साहनात्मक भत्ता | सर्जिकल प्रोसिजर साठी अदा करावयाचा प्रोत्साहनात्मक भत्ता |
|---|---|---|---|
| १. | उपचार करणारे मुख्य तज्ञ डॉक्टर (सर्जन, फिजीशियन व इतर) | ३० टक्के | ३० टक्के |



Scanned by CamScanner

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी पदनाम | मेडिकल प्रोसीजर साठी अदा करावयाचा प्रोत्साहनात्मक भत्ता | सर्जिकल प्रोसिजर साठी अदा करावयाचा प्रोत्साहनात्मक भत्ता |
|---|---|---|---|
| २. | सहकारी तज्ञ डॉक्टर (सर्जन फिजीशियनव इतर) | १५ टक्के | १५ टक्के |
| ३. | भूलतज्ञ | -- | १५ टक्के |
| ४. | उपचाराशी संबंधित इतर कन्सल्टंट | १० टक्के | १० टक्के |
| ५. | शस्त्रक्रियागृह उपचाराशी संबंधित वार्ड व इतर विभागातील स्टाफ नर्सेस, सिस्टर्स | १५ टक्के | १५ टक्के |
| ६. | शस्त्रक्रियागृह उपचाराशी संबंधित वार्ड व इतर विभागातील गट "ड" कर्मचारी | ५ टक्के | ५ टक्के |
| ७. | उपचाराशी संबंधित तांत्रिक कर्मचारी | ४ टक्के | ४ टक्के |
| ८. | रेकॉर्ड किपींग सिस्टीम मॅनेजमेन्ट | १ टक्के | १ टक्के |
| ९. | वैद्यकीय समन्वयक | ५ टक्के | ५ टक्के |
| १०. | इतर | १५ टक्के | ---- |
| | एकूण | १०० टक्के | १०० टक्के |

सदर योजनेंतर्गत रुग्णोपचार प्रक्रियेत समाविष्ट उपरोक्त संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणात प्रस्तावित केलेली प्रोत्साहन भत्ता रकमेची प्रतिमाह मर्यादा डॉक्टर / सर्जन, इत्यादिंच्या बाबतीत मूळ वेतन, महागाई भत्ता व त्यांना देण्यात येणाऱ्या व्यवसायरोध भत्त्याच्या ( Non-practicing Allowance) २० टक्के एवढी तर इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सदर प्रोत्साहनात्मक भत्ता / रक्कम मूळ वेतन व महागाई भत्ता रकमेच्या २० टक्के प्रतिमाह इतक्या मर्यादेत अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत विषयी रुग्णालयात या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या उपचाराच्या अनुषंगाने संबंधित विमा कंपनीकडे दाखल करण्यात येणारे दावे परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यासाठी स्पर्धात्मक निविदाद्वारे निवडण्यात येणाऱ्या बाह्यस्त्रोत कंपनीस सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रकरणपरत्वे प्रकरणी ३ टक्के पर्यंत निधी अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

४) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांना संबंधित आर्थिक वर्षात प्राप्त होणारा विमा स्वरूपातील उपरोक्त बाबींच्या प्रयोजनार्थ खर्च करण्यात आलेल्या निधीनंतर शिल्लक राहणारा ५२ टक्के निधी संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या बाबीवर संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित करण्यात येणाऱ्या समितीमार्फत विहीत कार्यपध्दतीनुसार व शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या आर्थिक मर्यादेत खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५) संबंधित संस्थेत संस्थेच्या दैनंदिन व महत्वाच्या कामांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या ५२ टक्के निधीतून कोणती कामे करणे आवश्यक आहे, या संदर्भातील बाबी ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक संस्थेत खालीलप्रामाणे समिती गठीत करण्यात यावी:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | संबंधित संस्थेचे अधिष्ठाता | अध्यक्ष |
| २. | संस्थेतील एक विभाग प्रमुख ( सर्जरी ) | सदस्य |
| ३. | संस्थेतील एक विभाग प्रमुख ( मेडिसीन ) | सदस्य |
| ४. | संबंधित संस्थेचे (महाविद्यालय / रुग्णालय ) मुख्य प्रशासकीय / प्रशासकीय अधिकारी | सदस्य सचिव |
| ५. | बांधकाम / विद्युत विषयक कामांच्या अनुषंगाने संबंधित संस्थेतील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता दर्जाचे वा त्याने नेमलेला राजपत्रित दर्जाचा अभियंता. | सदस्य |
| ६. | संबंधित रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक | सदस्य |

सदर समिती या निधीतून संस्थेची करण्यात येणारी कामे व त्याची प्राथमिकता, प्राधान्यता, निकड इत्यादी बाबत बैठकीत चर्चा करून ठरविण्यात यावीत. सदर बैठकीत संबंधित समिती याविषयी उपलब्ध निधीतून करण्यात आलेल्या कामांचा नियमितपणे आढावा घेईल. संबंधित विभागप्रमुख त्यांच्या विभागांतर्गत या निधीतून करण्यात येणाऱ्या /आलेल्या कामांचा प्रगती अहवाल / माहिती बैठकीत सादर करील. बैठकीचे सदस्य



Scanned by CamScanner

सचिव सदर माहितीचे संकलन करतील. याविषयी करण्यात येणारा खर्च केवळ शासनाने मान्यता दिलेल्या बाबींवरच विहीत कार्यपध्दतीनुसार, शासनाने वेळोवेळी विहीत / प्रदान केलेल्या आर्थिक मर्यादेतच करण्यात येईल, या तत्वाचे सदर समिती कटाक्षाने पालन करील. सदर समितीची प्रत्येक महिन्यात किमान एक बैठक आयोजित करण्यात येईल. सदर निधीतून संबंधित संस्थेमध्ये करण्यात येणाऱ्या कामांचा माहनिहाय झालेल्या खर्चाची माहिती संबंधित संस्था संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांना सादर करेल. संचालनालय सदर माहितीचे उचित कार्यवाहीस्तव संकलन करेल व झालेल्या खर्चाचा तिमाही आढावा घेईल; यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

६) सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये कालानुरूप व आवश्यकतेनुसार काही बाबी समाविष्ट वा वगळावयाच्या असतील तर अशी कार्यवाही शासन मान्यतेने करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

७) प्रस्तुत विषयी विभागाकडे आज दिनांकापर्यंत पूर्वीच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व सद्या कार्यान्वित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने विमा दाव्यापोटी प्राप्त रकमेपैकी शिल्लक असलेल्या रकमेतून २५ टक्के रक्कम शासनास (वित्त विभागास) समर्पित करण्यास व उर्वरीत ७५ टक्के रक्कम सदर प्रस्तावासह जोडलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केलेल्या बाबींवर खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

८) याविषयी सदर योजनेंतर्गत प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही प्रथम तीन वर्षांसाठी प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येईल. याबाबत तीन वर्षे पूर्ण होण्याच्या कालावधीपूर्वी सदर बाबींच्या एकंदरित फलनिष्पत्तीचा आढावा घेवून सदर प्रोत्साहन भत्ता अदा करणे बाबतची कार्यपध्दती सुरू ठेवावी किंवा कसे, याबाबत आढावा घेऊन शासन मान्यतेने पुनर्निर्णय घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

९) उपरोक्तप्रमाणे झालेला निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील रूग्णालयातील अधिकारी / कर्मचारी यांनाही लागू करण्याबाबतची दूरूस्ती



Scanned by CamScanner

मंत्रीमंडळानी सुचवून त्यास मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुषंगे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाने करावी. तसेच सदर योजना राज्यातील सर्व महानगरपालिकांमधील रूग्णालयांना लागू करता येईल किंवा कसे याबाबत नगर विकास विभागाने पडताळणी करून स्वतंत्र कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत : परिशिष्ट "अ"

( संजय देशमुख )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
३) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४) मा.अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
९) सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान मंडळ, मुंबई.
१०) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
१५) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१६) सर्व अधिष्ठाता / वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रूग्णालय (संचालनालयामार्फत).



Scanned by CamScanner

१७) अधिधान व लेखाअधिकारी, मुंबई.

१८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२१) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२) सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

२३) कार्यासन अधिकारी (व्यय-१३ / अर्थ-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२४) निवडनस्ती (प्रशा-२).



Scanned by CamScanner

**शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक वैशिव-२०१७/प्र.क्र.२८२/प्रशा-२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट-अ**

| | परिशिष्ट-अ |
|---|---|
| अ.क्र. | बाबी |
| १. | संबंधित संस्थेमध्ये संशोधन विषयक कार्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनात्मक अहवाल / कागदपत्रे तयार करण्यासाठी संबंधित अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेतील तीन सेवा जेष्ठ विभाग प्रमुख यांचा समावेश असलेली समिती तयार करण्यात यावी. सदर समिती ५२ टक्के निधीपैकी ५ टक्के निधी उपरोक्त संशोधन विषयक बाब व आवश्यक यंत्रसामुग्री खरेदीसाठी आर्थिक मर्यादेच्या अधीन राहून मान्यता देईल. |
| २ | रुग्णालय बाह्य भूलतज्ञाच्या वा अन्य विषयातील तज्ञ यांच्या सेवा संबंधित रुग्णोपचारा संबंधित बाबीसाठी घेतल्यास शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या मर्यादेत अदा करावयाची फी |
| ३. | संस्थेतील ज्या यंत्रसामुग्रीचा देखभाल/दुरुस्ती करार अस्तित्वात नाही किंवा संपुष्टात आला आहे अशा यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीवर येणारा तातडीचा खर्च विहीत पध्दतीने करता येईल. त्याचप्रमाणे यंत्रसामुग्रीचा वार्षिक देखभाल करार करता येईल. |
| ४. | रुग्णालयीन सुधारणांबाबत येणाऱ्या अडीअडचणीवर मात करण्यासाठी लागणारा तातडीचा खर्च तसेच रुग्णांच्या कल्याणकारी योजनेवर येणारा खर्च. |
| ५. | अपवादात्मक परिस्थितीत रुग्णांना तातडीने लागणारी जीवरक्षक औषधे व उपकरणांवरील खर्च. |
| ६. | प्रयोगशाळा व रक्तपेढी अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने येणारा खर्च. |
| ७. | रुग्णवाहिकेच्या इंधनासाठी येणारा तातडीचा खर्च. |
| ८. | संबंधित महानगरपालिका/महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ/मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन मंडळाची दंडात्मक कारवाई टाळण्याच्या दृष्टीने येणारा किमान तातडीचा खर्च. तसेच रूग्ण उपचारास्तव पुरेसा व सुरळीत विद्युत पुरवठा व्हावा यास्तव करावयाच्या उपाययोजनांवरील करावयाचा खर्च (सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर) |
| ९. | देहदान करण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या शव वाहीनीवरील खर्च. |
| १०. | रुग्णालयाच्या इमारतीची तातडीची किरकोळ दुरुस्ती, यात काचेचे तावदान बदलणे, पाण्याची गळती थांबविण्यासाठी प्लॅस्टर करणे, नळांना वॉशर टाकणे इत्यादीसारख्या छोट्या दुरुस्त्यांचा समावेश राहील. |
| ११. | विद्यार्थी हिताच्या दृष्टीकोनातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळा अद्ययावत ठेवण्यासाठी लागणारी उपकरणे, शैक्षणिक प्रयोजनार्थ लागणारी उपकरणे तसेच ग्रंथालयातील शैक्षणिकदृष्ट्या महत्वाची पुस्तके सुस्थितीत ठेवण्यासाठी येणारा आवर्ती/अनावर्ती खर्च. |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| १२. | संबंधित उद्दिष्टाखाली पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास अत्यंत तातडीच्या परिस्थितीत संस्थेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री विहीत कार्यपध्दतीनुसार व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेत खरेदी करणे. |
| १३. | (२१) सामुग्री व पुरवठा या उद्दिष्ठाखाली पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्यास अत्यंत तातडीच्या परिस्थितीत वैद्यकीय शिक्षण व रुग्णहित विचारात घेता या उद्दिष्टाखालील बाबी विहीत कार्यपध्दतीनुसार व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेत खरेदी करणे. |
| १४. | (७२) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री दुरूस्ती व परिरक्षण उद्दिष्टाखाली पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यास याविषयीचा खर्च (विहीत कार्यपध्दतीनुसार). |
| १५. | अनुदानाअभावी प्रलंबित असलेली जीवरक्षक प्राणवायु पुरवठ्यांची देयके. |
| १६. | संबंधित उद्दिष्टाखाली निधी उपलब्ध नसल्यास कंत्राटी सेवेची देयके. |
| १७. | संबंधित उद्दिष्टाखाली निधी नसल्यास रुग्णोपचारासाठी आवश्यक वाहने व रुग्णवाहिका दुरूस्ती. |
| १८. | यंत्रसामुग्री व साधनसामुग्री निर्लेखन निरिक्षणासाठी येणारा खर्च. |
| १९. | संस्थेच्या जागेची मोजणीसाठी अदा करावयाचे शासकीय शुल्क. |
| २०. | संबंधित उद्दिष्टाखाली निधी उपलब्ध नसल्यास (१९) आहार खर्चावरील प्रलंबित देयके. |
| २१. | रसायने व किट्स यांची प्रलंबित देयके. |
| २२. | संबंधित लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध नसल्यास जैविक निकृष्ट दर्जाची (बायोडिग्रीडेबल) / जैविक औषधी कचऱ्याच्या पिशव्या (बायो मेडिकल वेस्ट बॅगांची) प्रलंबित देयके. |

*_*_*_*_*



Scanned by CamScanner